## निविदा अटी व शर्ती

१) कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा किंवा स्विकारण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

२) को-या निविदा नमून्याची अटी व शर्तीची प्रत कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांचे कार्यालयात प्राप्त होतील. तसेच नोटीस बोर्डावर पाहावयास मिळतील.

३) अटी असलेली निविदा स्विकारली जाणार नाही तसेच दुस-या राज्याची नोंदणी ग्राहय धरली जाणार नाही.

४) सार्व.बांधकाम विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्राव्यतिरिक्त इतर ठेकेदारांची नोंदणी ग्राहय धरली जाणार नाही.तसेच नोंदणीचे प्रकरण सुरु आहे अशा ठेकेदारांना निविदा दिली जाणार नाही.

५) निविदा ग्राहय कालावधी निविदा उघडल्याच्या दिनांकापासून १२० दिवसांपर्यत असेल.

६) निविदा दोन लिफाफे पदधतीने सादर करावीत. लिफाफा क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

अ) सार्व.बांधकाम विभागाकडील किंवा बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगांव कडील नोंदणी प्रमाणपत्र ब) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम २००५ नुसार कलम ८ व ९ अन्वये नोंदणीचा दाखला क) इसारा रक्कम कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅंकेचा धनाकर्षाच्या स्वरुपात मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद,जळगाव यांचे नावे रेखांकीत केलेला असावा.अथवा जिल्हा मध्यवर्ती बॅंकेत भरणा केलेले चलन ड) मशिनरीची यादी , तांत्रीक कर्मचा-याची यादी, पुर्ण झालेल्या कामांची स्वाक्षांकीत यादी, अपूर्ण असलेल्या कामांची स्वाक्षांकीत यादी. लिफाफा क्र. २ मध्ये निविदा फॉर्म भरुन सादर करावा. व लिफाफा क्र. १ व २ असे दोन्ही लिफाफे सामायीक पाकीट क्र. ३ मध्ये मोहरबंद करुन म.अंतर्गत लेखा परिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचे कार्यालयात सादर करावा.

७) देयकातून नियमानुसार आयकर, मुल्यवर्धीत कर / शासनाकडून भविष्यात लागु केले जाणारे कर कपात करण्यात येईल.

८) सुरक्षा अनामत रक्कम ही कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांचे नांवाने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅंकेच्या एफ. डी. आर. स्वरुपात अथवा जिल्हा मध्यवर्ती बॅंकेच्या चलनाच्या स्वरुपात असावा.

९) अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम :- ज्या स्विकृत निविदेचा देकार (दर) निविदेतील अंदाजीत दरापेक्षा १० टक्के हून कमी असेल अशा निविदेच्या बाबतीत निविदा स्विकारण्यापुर्वी खाली दर्शविलेल्या प्रमाणे अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक राहील.

अ) १० टक्के ते १५ टक्के कमी दराच्या निविदासाठी निविदेच्या किंमतीच्या ४ टक्के सुरवातीला + २ टक्के प्रत्येक देयकातून.

ब) १५ टक्के पेक्षा जास्त कमी दराने सादर केलेल्या निविदांसाठी निविदा किंमतीच्या ६ टक्के सुरवातीला + २ टक्के प्रत्येक देयकातून.

१०) शासकीय विमा निधी नियमानुसार मक्तेदारास प्रत्येक कामाचा व सदर कामावर काम करणाऱ्या प्रत्येक मजुरांचा विमा उतरविणे बंधनकारक राहील.

**कार्यकारी अभियंता**
**लघु सिंचन विभाग**
**जिल्हा परिषद, जळगांव**

## लघु सिंचन विभाग जिल्हा परिषद,जळगाव

दिनांक :- २९/०१/२००९

निविदा सुचना क्र.२ सन २००८/२००९

म.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,जळगाव यांचे वतीने कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग जिल्हा परिषद,जळगाव हे खालील नमूद कामांच्या सिलबंद निविदा महाराष्ट्र शासनाच्या सार्व.बांधकाम विभाग किंवा बांधकाम विभाग जिल्हा परिषद जळगाव कडील योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. को-या निविदा म.अंतर्गत लेखा परिक्षण अधिकारी,जिल्हा परिषद,जळगाव यांचे कार्यालयात (सुटीचे दिवस सोडून ) कार्यालयीन वेळेत खालील तक्त्यात दर्शविलेनुसार मिळतील दिनांक १६/०२/०९ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत अंतर्गत लेखा परिक्षण अधिकारी,जिल्हा परिषद,जळगाव यांचेच कार्यालयात स्विकारण्यात येतील. व शक्य झाल्यास त्याच दिवशी लघुसिंचन विभागात उघडण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत निविदा फॉर्म फी परत दिली जाणार नाही.

तसेच ठेकेदार यांनी निविदा सादर करतांना पाकीट क्र. १ मध्ये नोंदणी प्रमाणपत्र, एम-व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र, तसेच हाती असलेल्या कामांची, पूर्ण झालेल्या कामांची, तांत्रीक कर्मचा-यांची यादी, मशिनरीची यादी, इसारा रक्कम कोणत्याही राष्ट्रीयीकृत बॅकेचा धनाकर्ष म.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचे नावे रेखांकीत (क्रॉस) केलेला सादर करावा. दोन्ही पाकीटे एका सामायीक पाकीटात मोहोरबंद करुन सादर करावे. त्याशिवाय निविदा स्विकृतीचा विचार केला जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव व तालुका | ठेकेदाराचा वर्ग | निविदाची अंदाजीत किंमत रक्कम रु. (कमी जास्त होण्याची शक्यता) | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | | निविदा विक्री दिनांक | निविदा स्विकृती दिनांक | काम पूर्ण करावयाचा कालावधी | को-या निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रोखीने २.५ टक्के | देयकातून २.५ टक्के | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | मौजे शेदुर्णी ता. जामनेर येथे (सोनद नदीवर) साठवण बंधारा बांधणे (२७०२ बि.आ.को.प.ब/पा.त.) | १ ते ५ | ३६,९०,०००/- | ३६,९००/- | ९२,२५०/- | ९२,२५०/- | १०/०२/०९ ते १२/०२/०९ | १६/०२/०९ | १८ महिने | ३,७००/- |

१) निविदाच्या अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील तसेच निविदा फॉर्म सोबत जोडण्यात आलेले आहे.
२) एक वा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवण्यात आलेले आहे.
३) निविदा दोन लिफाफे पदधतीनेच स्विकारण्यात येतील.

**कार्यकारी अभियंता,**
**लघु सिंचन विभाग**
**जिल्हा परिषद,जळगाव**